पुढारी

# विद्यापीठाच्या अधिष्ठातापदी डॉ. कामत, डॉ. महाजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ नुसार शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठातापदी प्रा. डॉ. रजनीश कामत यांची, तर वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठातापदी प्रा. डॉ. श्रीकृष्ण शंकर महाजन यांची निवड करण्यात आली. अधिष्ठाता पदासाठी विद्यापीठात पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या.



डॉ. कामत



डॉ. महाजन

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी निवड झालेले डॉ. कामत मूळचे कागल येथील आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स व संगणक शास्त्र अधिविभागाचे ते प्रमुख आहेत. देश-विदेशांतील नामांकित जर्नल्समध्ये त्यांचे २०० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. डॉ. महाजन विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्राध्यापक व अधिविभागप्रमुख आहेत. गेली २७ वर्षे ते शिक्षक, संशोधक व शैक्षणिक प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करीत आहेत. त्यांचे ४८ शोधनिबंध दर्जेदार जर्नल्समधून प्रकाशित झाले आहेत.

राष्ट्रीय विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक
महासत्ता
एकच आवृत्ती

# शिवाजी विद्यापीठाच्या पूर्णवेळ अधिष्ठातापदी डॉ. कामत व डॉ.महाजन यांची निवड

**कोल्हापूर ता.१४ (प्रतिनिधी)–**
..........................

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ नुसार शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठातापदी प्रा.डॉ. रजनीश कमलाकर कामत यांची आणि वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठातापदी प्रा.डॉ.श्रीकृष्ण शंकर महाजन यांची निवड करण्यात आली. या पदांसाठी पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी निवड झालेले डॉ.आर.के. कामत हे मूळचे कागल येथील आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक शास्त्र अधिविभागांचे ते वरिष्ठ प्राध्यापक आणि अधिविभागप्रमुख आहेत. देशविदेशांतील नामांकित जर्नल्समध्ये त्यांचे २०० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी १६ पुस्तके लिहिली आहेत. आतापर्यंत १८ विद्यार्थ्यांना त्यांनी पीएच.डी. साठी मार्गदर्शन केले आहे.

16 JUN 2022

वार्ता सम्राट

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या अधिष्ठातापदी डॉ.महाजन व डॉ.कामत

कोल्हापूर /प्रतिनिधी : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ नुसार शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठातापदी प्रा. (डॉ.) श्रीकृष्ण शंकर महाजन यांची आणि विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठातापदी प्रा. (डॉ.) रजनीश कमलाकर कामत यांची निवड करण्यात आली.



प्रा.डॉ श्रीकृष्ण महाजन



प्रा.डॉ. रजनीश कामत

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे नूतन अधिष्ठाता डॉ. एस.एस. महाजन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्राध्यापक व अधिविभाग प्रमुख आहेत. गेली २७ वर्षे ते शिक्षक, संशोधक व शैक्षणिक प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करीत आहेत. शिवाजी विद्यापीठासह सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई यांच्या संशोधन परीक्षण समित्यांसह पुणे विद्यापीठ व मुंबईच्या होमी भाभा विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून काम केले आहे. डॉ. महाजन यांचे ४८ शोधनिबंध दर्जेदार जर्नल्समधून प्रकाशित झाले आहेत. विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परिषदांतून त्यांनी ६८ शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १५ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. तर १३ जणांनी एम. फील. पूर्ण केली आहे. त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या तीन लघु आणि युजीसी, आयसीएसएसआर आणि इम्प्रेस यांच्या तीन मोठ्या संशोधन प्रकल्पांवर काम केले आहे. विद्यापीठाच्या विद्यापरिषद सदस्य, अधिसभा सदस्य आणि अभ्यास मंडळ अध्यक्ष म्हणूनही काम केले आहे.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी निवड झालेले डॉ. आर. के. कामत हे मूळचे कागल येथील आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक शास्त्र अधिविभागांचे ते वरिष्ठ प्राध्यापक आणि अधिविभागप्रमुख आहेत. देशविदेशांतील नामांकित जर्नल्समध्ये त्यांचे २०० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी १६ पुस्तके लिहिली आहेत. आतापर्यंत १८ विद्यार्थ्यांना त्यांनी पीएच.डी.साठी मार्गदर्शन केले आहे. शिवाजी विद्यापीठात भारत सरकारच्या निधीतून सायबर सुरक्षा केंद्र स्थापन करण्यामध्ये त्यांची महत्त्वाची भूमिका आहे.